रजि.नं. : ई-६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/ 1707 /२०२३
दिनांक:- - 3 AUG 2023

प्रति,

विषय:- श्री साईसच्चरीत पारायण सोहळा– २०२३ कार्यक्रमासाठी साई आश्रम भक्तनिवास येथील टेन्साईल फॅब्रीक शेडमध्ये आयोजीत करणेसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणे कामाचे सिलबंद दरपत्रक देणेबाबत...

श्री साईसच्चरीत पारायण सोहळा– २०२३ कार्यक्रमासाठी साई आश्रम भक्तनिवास येथील टेन्साईल फॅब्रीक शेडमध्ये आयोजीत करणेसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेकामी खालील तपशिलात नमूद केलेप्रमाणे मंडप उभारणी करावयाची आहे.

| अ. नं. | तपशिल | साईज | परिमाण / एकक | कालावधी | दर(रू.) |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | वॉटरप्रुफ छत असलेले व आतिल बाजूने सुशोभित कापडी मंडपाची उभारणी करणे. (लोखंडी कॉलम व कैच्याचे नट बोल्ट फीटींग असलेला डोम टाईप मंडप) | ९०' x ७७' | ६९३०.०० | दि.१७/०८/२०२३ ते दि.२५/०८/२०२३ अखेर ०९ दिवस | |
| ०२. | ताडपत्रीचे छत असलेले व आतील बाजून सुशोभित कापडी मंडपाची उभारणी करणे (एम.एस पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर असलेला मंडप) | ३०१' x १८' | ५४१८.०० | | |
| ०३. | ताडपत्रीचे छत असलेले व आतील बाजून सुशोभित कापडी मंडपाची उभारणी करणे (एम.एस पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर असलेला मंडप) | १२५' x १८'<br>६०' x ७०'<br>११५' x १५' | २२५०.००<br>४२००.००<br>१७२५.०० | | |
| ०४. | बैठकव्यवस्थेसाठी संपूर्ण मंडपामध्ये पी. व्ही. सी. मॅटींग टाकणे व त्यावर सिंथेटीक रेड कार्पेट टाकणे. | ३०१' x ७८'<br>७०' x ८०' | २३४७८.००<br>५६००.०० | | |
| ०५. | बॉक्स टाईप स्वागत कमान:- स्वागतासाठी आवश्यक त्याठिकाणी २'x२' बॉक्स टाईप आकाराची स्वागत कमानी उभारणे. कमानींची रुंदी २५ फुट व उंची १८ फुट असावी तसेच सदर कमानीस नवीन पांढरे व सुशोभित कापड लावणे अथवा निर्देश देण्यात येईल त्याप्रमाणे उभारणी करुन देणे. | - | ०३ नग | | |

मुंबई : साईनिकेतन, ८०४, ब, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४
दुरध्वनी : +९१-२२-२४१६६५५६ फॅक्स : +९१-२२-२४१५०७९८. टेलिग्राम - साईनिकेतन, मुंबई.
● Website : http://www.shrisaibabasansthan.org / www.sai.org.in ● Email : saibaba@sai.org.in

| अ. नं. | तपशिल | साईज | परिमाण / एकक | कालावधी | दर(रू.) |
|---|---|---|---|---|---|
| ०६. | **बॅरेकेडींग व्यवस्था करणे:-** एम. एस. पाईप वापरुन भक्कम स्वरुपाचे ४ फुट उंचीचे आवश्यक त्याठिकाणी लोखंडी बॅरीकेडींग व्यवस्था करणे. | - | ४४०.०० र.फूट | | |
| ०७. | **ग्रीन रूमः-** १५'x१५' - ०१ नग - प्रत्येकी ०४ खुर्च्या, ०१ टेबल व आरशासह बंदिस्त मंडप व्यवस्था करणे, तसेच सदर ग्रीन रूममध्ये सिंथेटीक रेड कारपेट टाकणे. | - | ०२ नग | | |
| ०८. | **कनात** – फॅब्रीक शेडचे बाजुने १० फुट उंचीची कापडी कनात (ताडपत्रीसह) उभारणे. | - | ९५५ र.फूट | | |
| ०९. | श्री साईसच्चरीत पारायण सोहळा– २०२२ करीता नाष्टा व चहा वाटपासाठी टेबल टाकणे. | - | ६० नग | | |

तरी उपरोक्त तपशिलाप्रमाणे मंडप उभारणेकामी सिलबंद दरपत्रके खालील अटी-शर्तीस अनुसरुन देणेचे करावे.

**अटी –शर्ती .**

१. यापुर्वी ज्यांनी दरपत्रक सादर करुन मंडप उभारणीचा कार्यादेश प्राप्त झालेनंतर मागणीनुसार मंडप उभारणी अथवा साहित्य पुरविलेले नाही, अशा दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

२. उपरोक्त नमूद मंडपापेक्षा जास्त आकाराचे / जादा मंडप उभारणी करणेबाबत संस्थानकडून सुचना / आदेश देण्यात आल्यास, मंजूर दरानेच जास्तीचे / जादाचे मंडप उभारणीचे काम दरपत्रकधारकास करावे लागेल.

३. उपरोक्त नमूद मंडपापेक्षा कमी अथवा जादा आकाराचे मंडप उभारणी करावयाची झाल्यास त्याप्रमाणे मंजूर दराने रक्कम कमी अथवा प्रत्यक्षात ज्या आकाराचे मंडप उभारणी करण्यात आली असेल, त्याप्रमाणे बील आदा केले जाईल.

४. दरपत्रकासोबत बयाना रक्कम रु.६,०००/- मात्र डि.डीव्दारे अथवा संस्थानचे लेखाशाखा विभागाचे पावतीव्दारे जमा करावी. तसेच मंडप उभारणीचा कार्यादेश मिळालेनंतर, मंजूर दराने होणा-या एकूण रक्कमेच्या ०५ (पाच) टक्के रक्कम अनामत म्हणून संस्थानकडे त्वरीत जमा करावी लागेल.

५. कार्यादेशातील मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मिळणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच कार्यादेश दिल्यानंतर मंडप उभारणीचे काम नाकारल्यास संस्थानकडे जमा असणारी बयाना रक्कम / अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

६. सरकारी नियमानुसार आवश्यक तेथे आयकर कपात केली जाईल.

७. मंडप उभारणीसाठी वापरण्यात येणारे साहित्य उदा. लोखंडी कॉलम, कैच्या,एम.एस. पाईप, लाकडी बल्ल्या, गोल्टे, बांबु, ताडपत्री, कापड इत्यादी मजबुत, टिकाऊ व सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य असलेले वापरावे लागेल.

८. मंडपाचे छताचे कापड स्वच्छ व सुशोभित असावे. शक्यतो नवीन कापड वापरणे योग्य राहील. फाटलेले, खराब, वेडीवाकडी शिवलेले असलेले कापड नाकारण्यात येईल.

९. मंडपाचे मोजमाप बाहेरील बल्ल्यांचे / पाईपचे आत आत मोजली जातील.

१०. मंडपाचे छतासाठी वापरण्यात येणारे कापड स्वच्छ व सुशोभित असल्याबाबत प्रथम बांधकाम विभागाकडून तपासून घ्यावे व नंतर त्याची बांधणी करावी. खराब कापडाची बांधणी केल्यास व नंतर ते कापड बदलावे लागल्यास त्याबद्दल जादा भरपाई अथवा रक्कम अदा केली जाणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकावर राहील. तसेच ठेकेदार यांनी मंडप उभारणीचे साहीत्य बांधकाम विभागामार्फत तपासून घेऊन, संस्थान अभियंता यांनी परवानगी दिलेनंतरच मंडप उभारणीचे काम सुरु करावे.

११. मंडपाचे साहित्य / सामान आणने – नेणे, त्याची वाहतूक करणे, ते संभाळणे, नैसर्गिक आपत्तीपासून व अपघात यापासून त्याचा बचाव करणे हे सर्वस्वी कोटेशन धारकाची जबाबदारी असून, त्याबाबत संस्थानमार्फत कुठल्याही स्वरुपात मदत / नुकसानभरपाई देणार नाही. तसेच मंडप उभारणी करतेवेळी बॅरेकेट / दोर लावावेत. जेणे करुन साईभक्तांना मंडप उभारणीचा त्रास होणार नाही. काम चालू असतांना साईभक्तांना इजा झाल्यास, जिवीत अथवा वित्त हानी झाल्यास त्यास मंडप ठेकेदार जबाबदार राहील.

..३/-

१२. मंडप उभारणीचे कालावधीमध्ये मंडप झुकल्यास / कापड फाटल्यास अथवा इतर कोणत्याही प्रकारचे त्याचे नुकसान झाल्यास ते त्वरीत निविदाधारकांने स्वखर्चाने दुरुस्त करुन / बदलुन द्यावयाचे आहे.

१३. मंडप उभारणी करीता मंडपाची फ्रेम तयार झालेनंतर छता करीता कापड बांधणीपुर्वी सदरची फ्रेम बांधकाम विभागामार्फत तपासणी करुन घ्यावी.

१४. मंडप व्यवस्था केलेनंतर ती भक्कम स्वरुपाची असलेबाबतची खात्री इकडील विभागामार्फत करुन घ्यावी लागेल. अन्यथा कार्यक्रमाचे वेळी अडथळा आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मंडप धारकांवर राहील व दंडास पात्र ठरेल याची नोंद घ्यावी.

१५. मंडप उभारणीचे कालावधीमध्ये / मंडपाची उभारणी पूर्ण झालेनंतर, मंडपाची देखरेख अथवा देखभाल दुरुस्ती करणेसाठी कर्मचारी / मजूर मंडप ठेकेदाराने नियमित हजर ठेवावयाचे आहेत. तसेच मंडपाविषयी सुचना / आदेश देणेसाठी एखाद्या जबाबदार कर्मचा-याची नेमणूक ठेकदाराने करावयाची असून, या संबंधीत जबाबदार कर्मचा-याने वेळोवेळी बांधकाम विभागाशी संपर्क साधावयाचा आहे. तसेच या संबंधीत जबाबदार कर्मचा-याने बांधकाम विभागाकडील नोंदवहीत हजेरी बाबतची नोंद व स्वाक्षरी करावयाची आहे.

१६. मंडप उभारणीचे दर भरतांना सर्वसमावेशक असे दर द्यावेत. वाहतुक, हमाली अथवा इतर कोणताही खर्च संस्थानमार्फत वेगळा दिला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१७. मंडप उभारणी कामाची बीले लेखाशाखेमार्फत RTGS ने अदा करण्यात येत असल्याने, आपले / आपल्या संस्थेचे बँकेत ज्या नांवाने बँकेत खाते आहे ते नांव, खाते नंबर, बँक IFC कोड नंबर तत्सम माहीती दरपत्रकात नमूद करावी जेणे करुन बिल अदा करणेस अडचण येणार नाही.

१७. सरकारी नियमानुसार आपणांस आपला स्वतःचा / फर्मचा पॅन नंबर व GST Registration No. इ. माहीतीचे छायांकीत प्रती देणे बधनकारक राहील.

१८. दरपत्रक भरण्यापुर्वी जेथे – जेथे मंडप टाकावयाचे आहेत, त्या कार्यस्थळांची प्रथम समक्ष पहाणी करावी व नंतरच दरपत्रक भरावे. ब-याच वेळेस प्रत्यक्ष मंडप उभारणी करण्याचे वेळेस ऐनवेळी अडचणी / तक्रारी केला जातात. त्याबाबत तक्रारी ऐकून घेतली जाणार नाहीत.

१९. मंडप उभारणीचे बिल सादर करणेपूर्वी, संस्थान प्रतिनिधी व दरपत्रकधारकांनी एकत्रपणे मंडपाची मापे व मंडपाचे फोटो घ्यावयाची असून त्याबाबतचा अहवाल दोघांच्या नाव, पदनाम व स्वाक्षरीनिशी कार्यालयात जमा करावयाचा आहे व या अहवालाप्रमाणेच निविदाधारकांने बिल तयार करणेत येईल.

२०. मंडप उभारणीचे बिल सादर करतांना, कार्यादेशातील व नियमाप्रमाणे पूर्ण तपशिल असणे आवश्यक आहे. संक्षिप्त अथवा त्रोटक स्वरुपात उल्लेख करु नये, अन्यथा बिल अदा केले जाणार नाही.

२१. कोणतेही दरपत्रक मंजूर अथवा नामंजूर करणेचा पूर्णतः अथवा अंशतः मंजूर करणेचा अथवा नामंजूर करणेचा हक्क संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे संस्थानवर बंधकारक असणार नाही.

२२. सदरील व्यवहाराबाबत वाद उत्पन्न झाल्यास तो राहाता न्यायालयाचे न्यायकक्षेत राहील.

२३. उपरोक्त शती व अटीत काही बदल, सुधारणा करणेचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखुन ठेवला आहे.

२४. दरपत्रकधारकाच्या कोणत्याही अटी – शर्ती संस्थानवर बंधनकारक राहणार नाहीत. त्याचा विचार केला जाणार नाही.

२५. उपरोक्त अटी – शर्ती पैकी एक किंवा अनेक किंवा कोणत्याही अटी – शर्तीचा भंग झाल्यास बयाना / अनामत रक्कम संस्थान जमा होणेस पात्र राहील.

२६. तसेच मंडप, पार्टीशन, बॅरेकटींग, कमानी व स्टेज उभारणीचे परिशिष्टामध्ये नमूद केले प्रमाणे मंडपाची उभारणी न केल्यास मंडपाचे देयक अदा केले जाणार नाही अथवा दरात कपात केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

२७. दरपत्रकात नमूद केलेल्या दरांबाबत चर्चा / वाटाघाटी केल्या जाणार नाहीत. त्यासाठी दरपत्रकधारक यांनी अंतिम दर द्यावेत.

२८. कोटेशन स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार संस्थान प्रशासनाचा राहिल.

२९. मुदतीत न आलेल्या / मुदतीनंतर आलेल्या कोटेशनचा विचार केला जाणार नाही.

३०. कोटेशनधारकाने मंडप उभारणीस नकार दिल्यास ते काम दुस-या ठेकेदाराकडून करुन घेण्यात येईल व सदर कामाची ठेकेदाराचे सुरक्षा अनामत रक्कम व जादाची रक्कम ठेकेदाराकडून वसुल करण्यात येईल.

३१. काम पूर्ण करण्यासाठी दिलेल्या कालावधीत काम पूर्ण न केल्यास रु.५००/- प्रतिदिन पर्यंत दंडाची आकारणी करण्यात येईल.

३२. आपले सिलबंद दरपत्रक मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे नावे सादर करुन त्यावर कामाचा उल्लेख करावा अथवा दरपत्रकाचा जावक क्रमांक व दिनांक लिहण्यात यावा ही विनंती.

३३. आपले सिलबंद दरपत्रक संस्थान कार्यालयात दि. 08/08/२०२३ अखेर ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी सादर करावे.

Signed by P Siva Sankar
Date: 02-08-2023 18:05:50

(बी.डी.दाभाडे)
कार्यकारी अभियंता,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने.